नि.फौ. ख.क्रं.६४१/२०२३
शासन –वि.– नितीन
नि. क्र. ३८ वर

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची शपथेवर साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : अनिल अप्पाराव राठोड
माझे वय : २६ वर्षे
व्यवसाय : शेती
राहणार : एकंबी तांडा ता. औसा, जि.लातुर

**१.** मी आरोपींना ओळखते. ते आमचे नातेवाईक आहेत. घटना कधी व कोठे घटली होती हे मला आठवत नाही. घटना एकंबी तांड्यावर संध्याकाळी घडली होती. आरोपी हे नातेवाईक असल्यामुळे त्यांच्यात व आमच्यात गैरसमजुतीने किरकोळ वाद झाला होता. आम्ही पोलीस ठाण्यात गेलो होतो. माझ्या वडीलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही.

**<u>सदरचा साक्षीदार हा घडलेल्या हकीकती प्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे, सरकारी विधिज्ञांनी उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३, चे कलम १५७ नुसार परवानगी देण्यात आली</u>.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि २४.०९.२०२३ रोजी संध्याकाळी ८.३० वाजता आरोपींनी येवुन मला, माझ्या वडीलांना भानमती का करतो असे म्हणुन मारहाण केली. त्यावेळी मला, माझ्या आई वडीलांना जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, जबाबामधील अधोरेखांकीत भाग अ बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी **<u>नि.क्र. ३४</u>** प्रमाणे न्यायालयाबाहेर आरोपींसोबत माझी तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की,माझी आरोपींविरुध्द आज रोजी कोणतीही तक्रार नसुन सदरचा खटला

नि.फौ. ख.क्रं.६४१/२०२३
शासन –वि.– नितीन
नि. क्र. ३८ वर

मला पुढे चालवयचा नाही.

**सरतपास पुर्ण**

**<u>आरोपी तर्फे विधिज्ञ श्री एन. एस. राठोड यांच्या मार्फत साक्षीदाराचा उलटतपास नाकारला.</u>**

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.21 17:50:09 +0530

**औसा** (एस. डी. साबळे)

**दिनांकः २१/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**

**औसा, जिल्हा लातुर**